स्वामी विवेकानंद अध्यापक महाविद्यालय,
उदगीर.

नाव :→ चव्हाण स्नेहा भरत

वर्ग :→ B.Ed. FY

B.EDCC 101 :-

# * ज्ञान आणि अभ्यासक्रम *

## 1) भाषेचे महत्त्व

मानवी समाजाचे संदेशाचे माध्यम म्हणून भाषेचा स्विकार केला. मानवी मनातील विचाराचे मौखिक ध्वनीद्वारे प्रकटीकरण करून भाषा विकसित केली. भाषा ही एक सामाजिक संस्था आहे. भाषा ही परिवर्तनशील आहे. ती संदेशावर आधारलेली असते. ती एक मानसिक आणि बौद्धिक प्रकिया असून ती प्रभावी संदेश देण्याची प्रकिया आहे.

मानवाला आलेला अनुभव भाषेमुळे त्यांना साठवून ठेवता येतात. भाषा ही अनुभव जतन करण्याची एक प्रमुख साधन आहे. भाषेमुळेच मानवाने घेतलेल्या अनुभवाला महत्त्व प्राप्त होते. मानवाच्या विकास इतर प्राण्यापेक्षा अधिक होण्याचे कारण म्हणजे भाषा होय. भाषेमुळे मानवाला नेत्रदिप प्रगती करता आली. भाषेच्या आधारावरच माणसाला विचार व्यक्त करता येऊ लागला. सामाजिकता प्राप्त झाली. एवढेच नाही तर मानवाला सुसंस्कृत करण्याचे पूर्ण श्रेय भाषेला जाते. भाषेमुळेच मानवाला आणि सृष्टीला स्थिरता प्राप्त झाली. आणि यातून संस्कृतीचा उदय झाला.

Date ..........

संस्कृतीमध्ये मानवाचे आचार - विचार, कला, साहित्य, शास्त्र, तत्वज्ञान, इतिहास, जीवनमूल्य आणि जीवनदृष्टी इत्यादी अनेक गोष्टींवर अंतर्भाव होतो. यासाठी आवश्यक असणारा पूर्वजांच्या ज्ञानाचा आणि अनुभवांचा वारसा भाषेच्या माध्यमातून आपणास प्राप्त होतो. संस्कृतीची निर्मिती, संस्कृतीचे रक्षण आणि संस्कृतीचे संवर्धन या दृष्टीने भाषेचे महत्त्व खूप जास्त आहे.

आई - वडिल, आजी - आजोबा, पणजी - पणजोबा यांच्याकडून आपणास जशी अनुवंशीकता प्राप्त होते तसा नव्या पिढीला संस्कृतीक वारसा भाषेद्वारे प्राप्त होतो. हा सांस्कृतिक वारसा जर नवीन पिढीला मिळाला नाही तर नवीन पिढी प्रगती करू शकणार नाही. त्यामुळे भाषेद्वारे लाभलेल्या वारसाच्या आधारे नवीन पिढी संस्कृती संवर्धनाचे काम चांगल्या प्रकारे करू शकते.

भाषा हा शब्द संस्कृत शब्द आहे. 'भाष्' या धातूपासून हा बनला आहे. 'भाष्' याचा मूळ अर्थ बोलणे असा होतो. भाषा म्हणजे ध्वनीचा समुच्चय, ध्वनी उत्पन्न करण्याची शक्ती सर्व प्राणीमात्रांमध्ये आहे. परंतू प्राणीमात्रांमध्ये पशुपक्ष्यांमध्ये निर्माण होणाऱ्या ध्वनी या केवळ ध्वनीच असतात. त्यांना अर्थ प्राप्त झाला नाही. परंतू मानवाने उत्पन्न


Teacher's Signature : ____________

केलेला आवाज यामध्ये खूप फरक आहे. मानसाने निर्माण केलेल्या ध्वनिला, आवाजाला अर्थ प्राप्त करून देण्याचे सामर्थ्य फक्त मानवाला अवगत झाले. इतर प्राण्यांना ती गोष्ट साध्य झाली नाही. या सामर्थ्यामुळे मानव आपले जीवन इतर प्राण्यापेक्षा वेगळे सुखकर आणि आनंददायी करू शकला आहे.

भाषेच्या विविध अंगाने म्हणजेच प्रामुख्याने गद्य, पद्य, व्याकरण, लेखन, वाचन व भाषण इत्यादींच्या स्वरूपामध्ये समावेश होतो. सर्वसामान्यपणे भाषा अध्यापनाचा विचार करताना ढोबळ मानाने अध्यापनाची उद्दीष्ट्ये, शैक्षणीक अनुभुती, अध्यापन पद्धती, मुल्यमापन तसेच तंत्रे, प्रयुक्त्या, क्लृप्त्या इ. साधनांचा विचार करावा लागतो.

व्यक्तीजिवन व समाजजीवन यामध्ये भाषेला अनन्यसाधारण महत्व आहे. भाषेशिवाय मानवी जीवन अस्तीत्वात राहणे अशक्यप्राय आहे. भाषा म्हणजे विचाराचा पाया होय. ती विचाराची जननी आहे. एवढेच कशाला मौन किंवा चिंतनामध्ये आपला जो विचार चालू असतो तो देखील भाषेच्या माध्यमातूनच असतो हे विसरून चालणार नाही. भाषेचे अध्यापन साहित्याद्वारे करत असतो.

भाषेच्या विविध अंग-उपअंगाचे सूक्ष्म स्वरूपात अध्ययन अध्यापन करणे आवश्यक ठरते. भाषेचे स्वरूप पुढील आकृतीद्वारे अधिकपणे स्पष्ट सांगता येते



## 2) बहुभाषिक गटाचा अभ्यास

बहुभाषिकता म्हणजे एकापेक्षा जास्त भाषा बोलल्या जातात अशी राष्ट्राची समाजाची, व्यक्तीची स्थिती अनेक भाषा येत असल्याची अवस्था जगामध्ये सर्वत्र बहुभाषिकता दिसून येते पूर्वी मात्र एक राष्ट्र, एक भाषा असतो, असेही मानले जात असे, स्वातंत्र्यपूर्व काळात हिंदी भाषेला राष्ट्रभाषा करण्यावर एकमत होते. व्यावहारिक कारणांसाठी बहुभाषिक राष्ट्राला सर्वांना समजेल, शिकता येईल अशी एक भाषा असते तीला संपर्क भाषा असे म्हणतात. भारत हे जगातील सर्वात मोठे बहुभाषिक राष्ट्र आहे. बहुभाषिक समाजामध्ये वेगवेगळ्या भाषा बोलणाऱ्यांमध्ये स्पर्धा असते.

यामधून निर्माण होणारे प्रश्न सोडविण्यासाठी शासनाकडून भाषेचे नियोजन करण्यात येते. शिक्षणाच्या माध्यमातून भाषासंदर्भात धोरण राबविता येते. भाषा शिक्षणाचे धोरण शिक्षकांना माहित असले तर भाषा अध्यापन करताना ते विद्यार्थ्यांना योग्य दिशा देऊ शकतात.

भारतात सर्वच प्रांतानी आपापल्या राजभाषेचा शैक्षणिक माध्यम म्हणून स्वीकार केला आहे. बहुभाषिक राष्ट्रामध्ये परस्पर संपर्कासाठी सत्ता आणि प्रतिष्ठा असणाऱ्या लोकांची भाषा विस्तृत संपर्क भाषा होते.

राष्ट्राप्रमाणेच समाजही बहुभाषिक असावा. संपर्कामधून येणारी बहुभाषिकता ही लोकबहुभाषिकता आहे. एखादी भाषा बोलणाऱ्यांशी संपर्क न येता शाळेत ती भाषा शिक्षकांकडून शिकता येते ती अभिजात बहुभाषिकता होय. भारतात इंग्रजी ही प्रतिष्ठा व आर्थिक सत्तेचा मार्ग असल्यामुळे मागील इतिहास विसरून विस्तृत संपर्क भाषा होऊ लागली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरही इंग्रजी भाषेचे स्थान महत्वाचे आहे.

राष्ट्राप्रमाणेच समाजही बहुभाषिक असतो. भारतात वेगवेगळ्या प्रांताच्या भाषा वेगळ्या, भारत हे बहुभाषिक राष्ट्र आहे. तर प्रांताच्या सीमेवरचे समाजही बहुभाषिक आहेत. व्यक्ती अनेक भाषा शिकून बहुभाषिक होते. म्हणजे बहुभाषिकता ही राष्ट्राची समाजाची, व्यक्तीची असू शकते. संपर्कातून टिकून टिकून येणारी बहुभाषिकता ही लोक बहुभाषिकता आहे.

भारतातील शिक्षित मध्यमवर्ग हा मातृभाषा व इंग्रजी अशा दोन भाषा येणारी द्विभाषी, बहुभाषिक वर्ग आहे.

1990 च्या पाहणीनुसार जगामध्ये ५००-८०० भिन्न संस्कृतीक समूह, 9160 राष्ट्र आहेत. ५००० पेक्षा जास्त भाषा या राष्ट्रामध्ये व त्यामध्ये राहणाऱ्या समुहामध्ये वापरात आहेत याचाच अर्थ असा की, राष्ट्रभाषा वेगळी आणि आपली मातृभाषा वेगळी अशी परिस्थीती असणारे लोक खूप मोठ्या प्रमाणावर आहेत. केवळ एकभाषिक राहून चालणार नाही अशी असंख्य लोकांची अवस्था आहे. बहुभाषिकता अशा रितीने सर्वत्र आढळणारी बाब आहे.

भाषा शिकण्याची शक्ती जन्मत: माणसात असते. निसर्गत: तो शिकत असतो. मनुष्य जेव्हा मातृभाषा शिकतो तेव्हा मातृभाषा तर तो आत्मसात करतोच पण त्यासोबतच त्यांचा सर्व सामान्य भाषा शिकण्यासाठी आवश्यक असलेला शारिरीक व मानसिक पक्वता त्यांच्यात निर्माण होत असते. यालाच नवीन भाषा शिकण्याची पूर्वतयारी असेही म्हणता येईल.

अंतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यवहारासाठी फक्त प्रादेशिक भाषेचे ज्ञान पुरेसे ठरत नाही ही दूरदृष्टी ठेवूनच कोठारी आयोगाने (1946 - 66) भाषाविषयक धोरण निश्चित केले होते.

भारतातील भाषांचा विकास व्हावा व सर्वत्र भाषांचे ज्ञान व्हावे तसेच राष्ट्रीय, सामाजिक एकात्मतेला चालना मिळण्यासाठी विद्यार्थ्यांचा बहुभाषिक विकास महत्त्वाचा आहे. कोठारी आयोगाने भाषा विषयक धोरण निश्चित करत असताना त्रिभाषासूत्र सांगितले आहे त्यामध्ये -

1) प्रादेशिक / मातृभाषा ही प्रथम भाषा असेल.

2) राष्ट्रभाषा ही द्वितीय भाषा

3) परकीय / इंग्रजी भाषा ही तृतीय भाषा असेल असे कोठारी आयोगाने सांगितले आहे.

Very Good

BEDCC 102 :-

# * शाळा व्यवस्थापन आणि प्रशासन *

## शाळा योजना, मुख्याध्यापकांची कार्ये आणि NAAC ची भूमिका

* NAAC :→

एनएसी ही 1994 मध्ये कुजीसीने स्थापन केलेली एक स्वायत्त संस्था आहे. शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी सतत कार्य करण्यात मदत करण्याच्या उद्देशाने उच्च शिक्षणाचे शिक्षण संस्थांचे मूल्यांकन करणे व त्यास मान्यता देणे हा एनएएसीचा मुख्य अजेंडा आहे.

मूल्यांकन साठी निकष

1) अभ्यासक्रम पैलू
2) अध्यापन शिक्षण आणि मूल्यांकन
3) संशोधन सल्ला आणि विस्तार
4) पायाभूत सुविधा व शिक्षण संसाधने
5) विदयार्थ्यांचा आधार व प्रगती
6) संघटना आणि व्यवस्थापन

NAAC ची कार्ये :-

1) पत हस्तांतरण, विद्यार्थ्यांची गतिशीलता, परस्पर मान्यता यासारख्या संकल्पनांवर संस्था संवेदनशील करून गुणवत्ता टिकवणे आणि वाढती.

2) उत्तम कार्यपद्धतीची देवाणघेवाण करण्यासाठी मान्यता प्राप्त संस्थामध्ये नेटवर्किंग.

3) प्रमाणीकरण निकालाच्या पाठपुराव्यासाठी गुणवत्ता मंडळे तयार करणे.

4) धोरणात्मक पुढाकारांसाठी मान्यतेच्या परिणामाचे राज्य वार विश्लेषण

5) दर्जेदार उपक्रमांसाठी लीड कॉलेजस आणि कॉलेजांची क्लस्टर या संकल्पनेची जाहिरात करणे.

6) दर्जेदार नवकल्पनांसाठी अधिकृत संस्थांना प्रकल्प अनुदान.

7) उच्च शिक्षणातील दर्जेदार विषयांवर सेमिनार / कॉन्फरन्स / कार्यशाळा आयोजित करण्यासाठी मान्यताप्राप्त संस्थेस आर्थिक सहाय्य.

8) परस्पर मान्यतेसाठी आंतरराष्ट्रीय दुवा विकसित करणे.

9) विशिष्ट विषयांच्या मान्यतेसाठी अन्य राष्ट्रीय व्यावसायिक संस्थांशी सहकार्य करणे.

10) मुक्त विद्यापीठे व पत्रव्यवहार अभ्यासक्रमांच्या मान्यतेसाठी दूरस्थ शिक्षण परिषदेचे संयुक्त उपक्रम

11) प्रत्यार्पणासाठी राज्यस्तरीय समन्वय समिती.

12) वेगवेगळ्या विषयांत मान्यताप्राप्त राष्ट्रीय सल्लागार समिती

13) राष्ट्रीय पात्रता चौकट विकसीत करण्यासाठी इतर एजन्सीशी संवाद

14) विनांक-बेस कौशल्य आणि पायाभूत सुविधांचा विकास

15) उच्च शिक्षणामध्ये गुणवत्ता वाढीसाठी आणि उत्कृष्टतेसाठी प्रशिक्षण कार्यक्रम

16) शिक्षक शिक्षण संस्थांच्या स्वतःचे मूल्यांकन आणि मान्यता मिळवण्यासाठी नॅक-एनसीटीई संयुक्त क्रिया

17) मान्यताप्राप्त संस्थांमधील मान्यता-नंतरचा आढावा आणि गुणवत्ता टिकवणे.

Teacher's Signature :

18) महाविद्यालयीन शिक्षणातील मान्यता व विक्युराम : कर्नाटक सरकारबरोबर सामंजस्य करार

19) सीआयआयआय - एनएएसी उच्च शिक्षण समिट

## * मुख्याध्यापकांचे कार्ये :→

1) अध्यापन विषयक कार्ये :
मुख्याध्यापक प्रथम शिक्षक असला पाहिजे, तो सर्व शिक्षकांचा नेता असतो, इतर शिक्षक त्याचे अनुकरण करण्याची शक्यता असते. त्यामुळे त्याने आपला विषय प्रभावीपणे शिकवण्याची गरज असते.

2) नियोजन विषयक कार्ये :
स्थूलमानाने नियोजनाचे चार टप्पे मानता येतील पहिला टप्पा शाळा सुरू होण्यापूर्वीचा होय. नियोजनाच्या दुसऱ्या टप्प्यात शालेय वर्षाचा प्रथम दिवस येतो.
तिसऱ्या टप्प्यात शैक्षणिक वर्षातील अभ्यासक्रम व कार्ये येतात.
शेवटच्या टप्प्यात वार्षिक परिक्षेची तयारी, निकाल पत्रके, प्रगती पुस्तके, वार्षिक अहवाल, शाळा सोडल्याचे दाखले इ. बाबींचा समावेश असतो.

3) संघटन व प्रशासन विषयक कर्तव्ये :
- शालेय वास्तू व परिसर स्वच्छ व आरोग्यपूर्ण ठेवणे हे मुख्याध्यापकाचे कर्तव्य आहे. इमारतीची सुजनन, दुरुस्ती, नूतनीकरण, स्वच्छता, पाणी, इ घटकांचा सविस्तर विचार होतो.
- विद्यार्थी व वर्ग यांची व्यवस्था, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या कामाची विभागणी, अभ्यासानुवर्ती उपक्रम व अन्य कामाचे संघटन व प्रशासन करावे लागते

Date ......................                                        Page No. 15

४) पर्यवेक्षण विषयक कर्तव्ये :-
नियोजनानुसार कार्यवाही होते की नाही हे पाहण्याची म्हणजेच पर्यवेक्षणाची कामे मुख्याध्यापकास करावी लागतात
- शिक्षकाचे अध्यापन कामाचे सातत्याने व नियमितपणे पर्यवेक्षण करावे लागते. त्याच्यातील उणीवा व दोषांची चर्चा करून सुधारण्यासाठी मार्गदर्शनपर सूचना द्याव्या लागतात

५) मार्गदर्शक विषयक कर्तव्ये :-
विद्यार्थी, शिक्षक, पालक या सर्वांनाच निरनिराळ्या गोष्टीत विविध स्तरावरून मार्गदर्शनाची गरज असते. ही गरज मुख्याध्यापकाने पूर्ण करणे हेही त्याचे कर्तव्ये होय.

Teacher's Signature : ____________

## * माध्यमिक शाळेचा केस स्टडी आणि *
## * उच्च उत्कृष्ट शाळेसह त्याचे आकलन *

केस स्टडी :-

केस स्टडी निबंधांना सहसा तुमच्या केस स्टडी मधील उदाहरणे वापरून विशिष्ट प्रश्नांचे उत्तर दयावे लागते. ते सतत गदयात लिहिलेले आहेत. त्यांची रचना स्तर कोणत्याही निबंधाप्रमाणे प्रस्तावना, मुख्य भाग आणि निष्कर्षासह केली पाहिजे.

परिचय :-

यासाठी तीन गोष्टी असणे आवश्यक आहे

1). तुमच्या प्रकरणाचा परिचय

2) स्थिती विधान

3) उर्वरित निबंधाची रचना कशी आहे याचे संकेत हे त्या विशिष्ट क्रमाने असणे आवश्यक नाही परंतु ते सर्व समाविष्ट करणे आवश्यक आहे

मुख्य शरीर :-

साधारणपणे तुम्ही हे थीमॅटिक पध्दतीने आयोजित कराल.

प्रत्येक परिच्छेदाने एक मुद्दा बनवणे आवश्यक आहे आणि नंतर त्या बिंदूचे स्पष्टीकरण आणि बॅकअप घेण्यासाठी आपल्या केसमधील माहिती वापरणे आवश्यक आहे.

तुमचा युक्तिवाद मजबूत करण्यासाठी तुम्ही सिद्धांत (इतर वाचन) देखील आणाल. तुमच्या सिद्धान्ताशी कसे जोडले जाते आणि हे तुम्हाला कोणत्या निष्कर्षापर्यंत घेऊन जाते हे दाखवणे मान्य आहे; तथापि, तुम्ही जो मुद्दा मांडत आहात ते तुम्ही प्रथम तुमच्या वाचकाला कळवले तर उत्तम, कारण त्यांना परिच्छेदाच्या शेवटपर्यंत याचा दुसरा अंदाज लावावा लागणार नाही.

तुमच्या मुख्य भागातील प्रत्येक बिंदू तुम्ही प्रास्ताविकता दिलेल्या पोझिशन स्टेटमेंटकडे परत नेणारा असावा.

निष्कर्ष :-

केस स्टडीमधून तुम्ही कोणते मुख्य धडे शिकलात ? वास्तविकता जगाच्या उदाहरणाशी सिद्धांत किती योग्य आहे. तुम्हाला उपाय किंवा शिफारसी देण्यास सांगितले आहे का ? असल्यास, ते तेथे द्या.

संदर्भ यादी :-

तुम्ही तुमच्या निबंधात उध्दृत केलेले सर्व स्रोत समाविष्ट करा.

Good
[signature]

BEDCC 103 :-

# * समकालीन भारत आणि शिक्षण *

## शैक्षणिक विचारवंताचे योगदान

समाजाच्या सांस्कृतीक आणि सामाजिक विचार प्रवाहांना सुयोग्य वळण मिळवून देण्याचे काम शिक्षणाचे आहे. शिक्षणातील विचार प्रवाहांना आपल्या आचार, विचार व लेखणीद्वारे सर्वसामान्यापर्यंत पोहचवण्याचे महत्त्वाचे कार्य विचारवंतानी केले. किंवा अजूनही ते चालू आहे. जगात अनेक थोर शैक्षणिक विचारवंत होऊन गेले. त्यामध्ये आपल्या भारतातील अनेक विचारवंताचा समावेश होतो. प्रत्येक विचारवंताचे कार्य वेगवेगळे आहे.

महाराष्ट्रामध्ये सर्वप्रथम स्त्री शिक्षणाचा पाया रचणारे महात्मा जोतिराव फुले, स्त्री शिक्षणासाठी व स्त्रीयांच्या पुनरूद्धारासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित करणारे महर्षी धोंडो केशव कर्वे, महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणावर शाळा, महाविद्यालये स्थापन करून वसतिगृहाची सुविधा उपलब्ध करून देणारे कर्मवीर भाऊराव पाटील अशी न संपणारी अनेक नावे पुढे येतात.

## स्वामी रामानंद तिर्थ :→

स्वामी रामानंद तिर्थ (उर्फ व्यंकटेश भगवानराव खेडगीकर) यांचा जन्म 3 ऑक्टोबर 1903 मध्ये झाला. ते हैदराबाद स्वातंत्र्य लढ्यातील एक थोर नेते, समाज सुधारक, शिक्षण तज्ञ, विद्वान व महत्तुल्य व्यक्तीमत्व होते. त्यांचा जन्म कर्नाटकमधील सिंदगी या गावी झाला.

जन्मगावी प्राथमिक शिक्षण घेऊन त्यांनी एका राष्ट्रीय विद्यालतून मॅट्रिकची परिक्षा दिली. पुढे अमळनेर व पुणे येथील महाराष्ट्र विद्यापीठातून इतिहास, अर्थशास्त्र व राज्यशास्त्र या विषयांसह बी. ए. व 'लोकशाहीचा विकास' हा प्रबंध लिहून एम. ए. पदवी संपादन केली.

त्यानंतर 1926 मध्ये ना. म. जोशी यांच्या स्वीय सहाय्यकपदी ते रुजू झाले. त्यामुळे आपसुकच ते गिरणी कामगारांच्या लढ्यात सक्रिय सहभागी झाले. त्यांनी त्या वेळी 'या क्षणापासून माझे सर्व उर्वरित जीवन मी मातृभूमिच्या चरणी वाहत आहे, सर्व सुखाचा त्याग करून मी आजन्म ब्रम्हचर्य व्रताचे पालन करीन' अशी प्रतिज्ञा केली आणि आयुष्यभर तिचे पालन केले.

14 जानेवारी 1932 रोजी उस्मानाबाद मधील हिप्परगा येथे लखनौस्थित स्वामी नारायण यांच्याकडून संन्यासदीक्षा घेऊन ते स्वामी रामानंद तीर्थ झाले. त्यांनी हिप्परगा येथे तत्पुर्वीच 1930 मध्ये राष्ट्रीय विचारांच्या प्रचारार्थ शिक्षण संस्था काढली. याच काळात आ. कृ. वाघमारे आणि अनंतराव कुलकर्णी यांनी हैदराबाद संस्थानच्या जुलूमजबरस्तीला शह देण्यासाठी हैदराबाद संस्थान महाराष्ट्र संघाची स्थापना केली. अशा या थोर समाजसेवकाचे व समाजसुधारकाचे 2 जानेवारी 1972 रोजी निधन झाले.

त्यांचे वडिल सिंदगी गावात प्राथमिक शिक्षक होते. त्यांनी दोन मुलींनतर संन्यास घेतला पण पत्नीची संमती घेतली नव्हती. तेव्हा त्यांच्या गुरूंनी त्यांना परत गृहस्थाश्रमात जाण्याची आज्ञा दिली. त्यानंतर त्यांना स्वामीजी हे पुत्ररत्न झाले. स्वामीजी बालपणात निसर्ग सानिध्यात, जंगलात किंवा नदीकाठी एकटेच फिरत असत. मात्र ते हुषार असल्याने वर्गात पहिलाच क्रमांक असे. त्यांचे चौथीपर्यंतचे शिक्षण सिंदगी येथे झाल्यानंतर त्यांच्या वडिलांनी पुढील शिक्षणासाठी त्यांचा नॉर्थकोट हायस्कुल या सरकारी शाळांवर प्रवेश घेतला. तेथे

त्यांनी छोटी मोठी कामे करून शिक्षण घेतले.

स्वामीजी मॅट्रीक मध्ये असताना गांधी टोपी घालून एक हजार विद्यार्थ्यांना सोबत घेऊन इंग्रजांच्या शाळेवर बहिष्कार टाकण्यास सांगून स्वत:ही बहिष्कार टाकला. त्यामुळे स्वामीजींना छड्या खाव्या लागल्या. पण टोपी काढण्याचा हुकूम यांनी पाळला नाही. त्यांना शाळेतुन बहिष्कृत केले गेले. त्यांनतर त्यांनी इ.स. 1921 ते 1923 या काळात अमळनेर येथे राष्ट्रीय महाविद्यालयात इंटर्नशीप उत्तीर्ण झाले.

स्वामींजींनी 29 जुन 1929 रोजी हिप्परगा येथे राष्ट्रीय शिक्षणाचा अमृतकलश उभारला. ते नेहमी विद्यार्थ्यांनवर प्रेम करीत आणि त्यांना शहाणे करीत. आदर्श शिक्षक म्हणून त्यांची ख्याती होती.

स्वामीजी अतिशय शिस्तप्रिय होते. ते कधीही कोणत्याच कार्यात उशीर करीत नसे. तसेच दुसऱ्यांनी उशीर केलेला ही त्यांना खपत नसे. प्रत्येक क्षण मोलाचा असून तो आयुष्य घडविणारा असतो. तो वाया घालविणे म्हणजे आयुष्य कमी करणे होय, असे त्यांचे मत होते.

स्वामीजी अत्यंत स्वच्छता प्रिय होते. हिशोबही व्यवस्थित ठेवत आणि विद्यार्थांवर जीवापाड प्रेम करीत चाकोरीबद्ध शिक्षणशास्त्राचा विचार न करता विचार शिक्षणशास्त्राच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे होते. ते विद्यार्थ्यांना कधीच शिक्षा करत नव्हते. स्वामीजी मितभाषी पण मधुभाषी होते. शांत, संथ आणि आश्वासक भाषेत समजून सांगण्याचे त्यांच्याकडे कौशल्य होते.

## शिक्षणात एजन्सीची भूमिका :→

विद्यार्थांनी त्यांची दिशा निवडली म्हणून प्रशिक्षकाचे मार्गदर्शन आवश्यक आहे. कल्पना करा की एखादा एजंट एखाद्या अभिनेत्याला किंवा खेळाडूला करिअरच्या चांगल्या निर्णयांसाठी मार्गदर्शन करतो. विद्यार्थी एजन्सीमध्ये, शिक्षक त्यांच्या विद्यार्थी कलाकृतींचा शोध घेण्यासाठी एजंटची भूमिका घेतात.

प्रकल्प आणि समस्या - आधारित शिक्षण विद्यार्थ्यांना मनोरंजक आणि संबंधित क्रियाकल्पांद्वारे विद्यार्थी एजन्सी वाढवण्याची संधी प्रदान करते. जेव्हा विद्यार्थ्यांकडे एजन्सी असते, तेव्हा विद्यार्थी त्यांच्यासाठी अर्थपूर्ण मार्गाने बनवतो, तयार करतो, शेअर करतो, सहयोग करतो आणि प्रकाशित करतो.

Excellent

# * पर्यावरण शिक्षण आणि आपत्ती व्यवस्थापन *

## हवा प्रदुषण :→

हवा प्रदुषणाला वायू प्रदुषण असेही म्हणतात पृथ्वीच्या भोवती असणारे वायू व पाण्याची वाफ सजीवांच्या अस्तित्वासाठी आवश्यक असतात. वातावरणातील वायूंच्या निश्चित अशा प्रमाणामुळे वातावरणाचा जीवसृष्टीचे संरक्षक छत्र म्हणून उल्लेख केला जातो. हवा ही सजीवांसाठी अत्यंत उपयुक्त असते. हवेशिवाय मानवी जिवन अशक्य आहे. परंतु मानवी हस्तक्षेपामुळे वातावरण निर्दोष राहिलेले नाही. त्यात मानवनिर्मित 30,000 रसायने मिसळले आहेत. ते सध्या वातावरण प्रदुषित करत आहेत.

⇒ सभोवतालच्या पर्यावरणाला व मानवाला इजा होईल इतकी हवा अस्वच्छ होणे म्हणजे हवेचे प्रदुषण होय.

⇒ त्या हवेत वेगवेगळ्या प्रकारचे वायू, कार्बनचे कण, खनिजांचे कण, धूर इत्यादी अनावश्यक घटकांचा समावेश होऊन संतुलन बिघडते, अशा संतुलन बिघडलेल्या हवेमुळे मानव व इतर जीवांसाठी धोका निर्माण होतो तेव्हा त्याला हवेचे प्रदुषण असे म्हणतात.

Teacher's Signature : ____________

हवेचे प्रदुषण हे मुख्यत: वायूरूप व कणरूप अशा दोन प्रकारच्या पदार्थांचे असून यापैकी $SO_2$, $NO$, $NO_2$, $CO$ हे वायू रूप तर धूर, धूळ हे कणरूप पदार्थ आहेत

हवा प्रदुषणाची कारणे :→
हवेचे प्रदुषण मुख्यत्वे नैसर्गिक व मानवी कारणे कारणीभूत आहेत.

1) नैसर्गिक कारणे :
हवा प्रदुषण करणाऱ्या नैसर्गिक कारणांमध्ये ज्वालामुखीचा उद्रेक, भूकंप, वावटळी व धुळीची वादळे, हवेतील बाष्पाचे विविध आविष्कार, जंगलाला लागणारी आग (वणवे), उपद्रवी सुक्ष्म जीव-जंतु इत्यादींचा समावेश होतो.

अ) ज्वालामुखीचा उद्रेक : ज्वालामुखीच्या उद्रेकातुन विविध वायूरूप पदार्थ बाहेर पडतात. यापैकी हायड्रोजन वायूचे उद्रेकाच्या मुखालगत ज्वलन होऊन ज्वाला तयार होतात तर इतर घटक वातावरणात मिसळल्याने हवा प्रदुषण होते. वायूरूप पदार्थांसोबतच ज्वालामुखीची राख, धूळ व माती इ. घन पदार्थ हवेत मिसळून हवा प्रदुषित होते.

ब) भूकंप हालचाल : ही आकस्मित हालचाल घडून येत असताना भूपृष्ठाला तडे जाऊन भेगा पडतात या भेगातून भूगर्भातील अमोनिया क्लोराईड, हायड्रोजन सल्फाईड, हायड्रोक्लोरिक ॲसिड वायू बाहेर फेकले जातात. यामुळे हवा प्रदूषण होते. सागराच्या तळाशी भूकंप झाल्याने प्रचंड त्सुनामी लाटा निर्माण होऊन प्रदेशांची अपरिमित हानी होते

क) वावटळी व धुळीची वादळे : वावटळीत जमिनीवरील माती, वाळू, केरकचरा असे पदार्थ उंच वातावरणात उधळले जातात. तर धुळीच्या वादळात हलके कण वातावरणात दीर्घकाळ तरंगतात. हे सर्व पदार्थ हवेत मिसळल्याने हवेचे प्रदूषण होते

ड) हवेतील बाष्पाचे विविध आविष्कार :

इ) जंगलांना लागणारी आग (वनवा) : जंगलांना लागणारी आग म्हणजे वनवा. नैसर्गिकरित्या लागलेल्या आगीत मोठी वृक्ष, झाडे-झुडूप जळतात व त्यातून $CO_2$, $SO_2$, $H_2S$ इ. वायू व प्रचंड प्रमाणात धूर वातावरणात फेकले जातात.

ई) उपद्रवी सूक्ष्म जीव-जंतू : निसर्गनिर्मित काही उपद्रवी सूक्ष्म जीव-जंतू पासून बुरशी तयार होऊन, सूक्ष्म जीवजंतूच्या विषारी प्रादुर्भावामुळे हवेचे नैसर्गिकरित्या प्रदूषण होते.

२) मानवी कारणे (Human Causes) :→
हवा प्रदूषण करणाऱ्या मानवी कारणांमध्ये जीवाश्म इंधनाचा वापर, वाहनांचा वाढता वापर, औद्योगिकरण, अणुउर्जा निर्मिती, अणुस्फोट व युद्धे, घरगुती इंधनाचा वापर, धुम्रपान इ. समावेश होतो.

अ) जीवाश्म इंधनाचा वापर : मानवाने उर्जा किंवा शक्ती निर्मितीसाठी दगडी कोळसा, खनिज तेल, नैसर्गिक वायू या जीवाश्म इंधनाचा वापर केला असल्याने जीवाश्म इंधनातील कार्बन व सल्फर या प्रमुख द्रव्यांच्या अपूर्ण ज्वलनाने कार्बन मोनॉक्साईड, सल्फरडाय ऑक्साईड, कार्बनडाय ऑक्साईड, नायट्रोजनडाय ऑक्साईड हे घातक व विषारी वायू वातावरणात मिसळतात.

ब) वाहनांचा वाढता वापर : मानवाच्या गतीमान जीवनात स्वयंचलित वाहनांचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. रेल्वे, जहाजे, विमाने इ वाहतूक साधनांमध्ये कोळसा, खनिज तेल, गॅस वायूंचा वापर केला जातो. त्यांच्या ज्वलनातून $CO$, $CO_2$, $H_2S$, H, C व Hg संयुगे बाहेर पडतात.

क) औद्योगिकरण : औद्योगिकरणामुळे तयार झालेले औष्णिक कारखाने, कापड गिरण्या, सिमेंट उद्योग, रासायनिक, खनिज, तेल शुद्धीकरण

उद्योग व इतर कारखान्यांतून प्रचंड प्रमाणात धूर, असंख्य धूलिकणांसह नायट्रोजन ऑक्साईड, कार्बन मोनॉक्साईड, इ. हवेत मिसळून प्रदूषण होते.

३) अणुउर्जा निर्मिती : अणुउर्जा निर्मितीसाठी युरेनियम, थोरियम, ग्रॅफाईट, प्लुटोनियम यासारखी मूलद्रव्ये वापरली जातात. या मूलद्रव्यांच्या वापरामुळे मोठ्या प्रमाणावर किरणोत्सर्जन विषारी द्रव्ये हवेत सोडली जातात. अशी किरणोत्सर्जित द्रव्ये वर्षानुवर्षे विघटीत न होता वातावरणात दीर्घकाळ राहतात. त्यामुळे हवा प्रदूषण घडून येते.

४) अणुस्फोट व युद्धे : अणुस्फोट घडवून आणल्यामुळे वातावरणात मोठ्या प्रमाणावर उर्जा व धूळ मिसळते. दुसऱ्या महायुद्धात जपानमधील हिरोशिमा व नागासकी या शहरांवर टाकण्यात आलेल्या 'अणुबॉम्ब' मुळे किरणोत्सर्जित धूळ व विषारी वायू वातावरणात पसरल्याने हवेचे प्रदूषण झाले.

५) घरगुती इंधनाचा वापर : घरात स्वयंपाका-साठी वापरले जाणारे इंधन कोळसा, लाकूड, शेकेल, गोवऱ्या अशा स्वरूपाचे असेल तर धूर निर्माण होतो. त्यांच्या ज्वलनातून कार्बन मोनॉक्साईड, सल्फरडाय ऑक्साईड, नायट्रोजन ऑक्साईड इ. वायू बाहेर पडतात

3) धुम्रपान : धुम्रपान करणाऱ्या व्यक्ती हवेच्या प्रदूषणास कारणीभूत ठरतात. ग्रामीण व शहरी भागात सिगारेट्स, विड्या, चिलीम इ. वापर जास्त असून त्यांच्या धुरापासून हवेचे भ्रम प्रदूषण होते.

हवा प्रदूषणाचे परिणाम :-

हवा प्रदूषण प्राचीन काळापासून होत असून हवेच्या प्रदूषणाचा परिणाम मानवी आरोग्यासोबतच वनस्पती, प्राणी जीवन, प्राचीन कलाकृती, हवामान इ. होत असतो.

1) ओझोन थरावरील परिणाम :

पृथ्वीच्या सभोवती असलेल्या वातावरणातील स्थितांबर या थरामध्ये ओझोन वायूचा पट्टा आहे. या ओझोन पट्ट्यात किंवा थरात सूर्यापासून येणारी अतिनील किरणे शोषली जाऊन या घातक किरणांपासून पृथ्वीचे संरक्षण होते. म्हणून ओझोन थराला पृथ्वीचे संरक्षण कवच म्हणतात.

परंतू वातानुकूलित यंत्रे, आग प्रतिबंधक यंत्रे, हेअर ड्रायर्स, रेफ्रिजरेटर्स, सौंदर्य प्रसाधने जल फवारणारी उपकरणे, यांच्यामधून बाहेर पडणारा क्लोरोफ्लुरो कार्बन (CFC) आणि विमानाच्या इंधन ज्वलनातून बाहेर पडणारा NO वायूंचा ओझोन थरावर परिणाम होऊन ओझोन वायूचा नाश होतो.

२) मानवी आरोग्यावरील परिणाम :-
हवा प्रदूषित झाल्याने मानवी आरोग्यास अपाय होतो. डोनोरा, पेनसिल्व्हानिया येथील एका लक्षणीय घटनेने शास्त्रज्ञांचे लक्ष वेधून घेतले. हवेच्या प्रदूषणामुळे मानवी आरोग्यावर होणाऱ्या परिणामाची माहिती आता जगातील विविध देशांत एकत्रित केली जात असून हवेचे प्रदूषण मानवी आरोग्यासाठी सर्वांत हानीकारक ठरत आहे.

३) वनस्पती व प्राण्यावरील परिणाम :-
हवा प्रदूषणामुळे हवेतील वेगवेगळी लहान मोठे कणायुक्त प्रदूषके वनस्पतींच्या पानावर जमा होतात. त्यामुळे वनस्पतींची पर्णछिद्रे बुजुन जातात.

४) वातावरणावर होणारा परिणाम :-
वातावरणात कार्बनडाय ऑक्साईड व इतर हरितगृह वायूंचे प्रमाण वाढत असून हे वायू उष्णता मोठ्या प्रमाणावर ओढून घेतात. त्यामुळे भूपृष्ठावरील तापमान वाढत आहे. परिणामी हवामानात परिवर्तन होत आहे.

५) भौतिक परिणाम :- इंधन ज्वलनाने कारखान्याच्या धुरातून बाहेर पडणारे निरनिराळे विषारी वायू, वाढते तापमान, धूर-धुके, आम्लपर्जन्य या सर्वांचा पुरातन वास्तुशिल्प, सौंदर्यस्थळे, वस्तुसंग्रहालय यांच्यावर विपरित परिणाम होतो.

## * आपत्तीबद्दल कायदे आणि कायदेशीर पैलूंचा गंभीर अभ्यास *

→ भारत देशात आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 हा संसदेत 25 डिसेंबर 2005 रोजी पारित झाला.

भारतात 1993 साली ओडिशाच्या चक्रीवादळानंतर केंद्र सरकारने एक समिती स्थापन करून धोक्यांचा आणि त्यापासून उद्भवणाऱ्या आपत्तींचा सर्वकष अभ्यास केला. तसेच भारताने आपत्तिदरम्यान मदतकार्यासाठी व्यवस्थापनातील सगळे विभाग, शास्त्रीय संशोधनातील संस्था, शिक्षण संस्था आणि सामान्य जनसमुदाय तसेच बचाव कार्य करणाऱ्या संस्था यांच्यात सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न सुरू केला. परंतु 2004 साली आलेल्या त्सुनामीमुळे आपत्ती व्यवस्थापन कायदा बनवण्याची निकड करून चुकली

2019 साली आलेल्या कोरोना साथीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रासह देशातील अनेक राज्यात हा कायदा लागू करण्यात आला.

→ भारतामधील आपत्ती व्यवस्थापनाची व्याप्ती 2005 पर्यंत फक्त तात्काळ मदत व पुनर्वसन कार्यापर्यंतच मर्यादित होती. परंतु आता आपत्ती व्यवस्थापन कायदयातील प्रकरण १, कलम 2 (ड) नुसार आपत्तिपूर्व काळासंबंधी आपत्ती प्रतिबंध यंत्रणा किंवा पूर्वतयारी या बाबीसुद्धा समाविष्ट करण्यात आल्या आहेत. तसेच आपत्ती व्यवस्थापनांतर्गत नियोजन, संघटन, समन्वय व कार्यप्रणाली यांची सातत्यपूर्ण व समग्र अंमलबजावणी करणे गरजेचे आहे, याचा आवर्जून उल्लेख केला गेला आहे.

→ त्रिस्तरीय (शासकीय) संस्थात्मक रचना : यामध्ये राष्ट्रीय, राज्य व जिल्हा पातळ्यांवर आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तसेच राष्ट्रीय व राज्य स्तरावर कार्यकारी समिती स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली आहे. आपत्ती व्यवस्थापनाची जबाबदारी विविध शासकिय खात्यांमध्ये विभागण्यात आली आहे.

→ आपत्ती व्यवस्थापन धोरण व कृती आराखड्यांना महत्त्व : केंद्र व राज्यातील प्रत्येक मंत्रालय किंवा विभागाने विकास कार्यक्रमात व प्रकल्पात आपत्ती व्यवस्थापनाच्या तत्वांचा, कार्यप्रणालींचा आणि संभाव्य धोक्यांचा विचार करणे अनिवार्य आहे. या आराखड्यामध्ये कोणत्या परिस्थितीत कोणी काय काम करायची आणि आपत्तिरोधक कोणती कार्ये करायची, हे नमूद करणे अपेक्षित आहे.

→ राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण : ही एक केंद्र शासनाची अधिकृत संस्था असल्याने आपत्ती व्यवस्थापनाच्या राष्ट्रीय स्तरावरील धोरणामध्ये व कारभारामध्ये या संस्थेचा मोलाचा वाटा असणार आहे. या कायद्यानुसार या प्राधिकरणाचे सर्वेसर्वा भारताचे पंतप्रधान असतील.

→ राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल : आपत्कालीन परिस्थितीत मदत, बचाव व इतर प्रतिसादात्मक कार्ये सक्षमपणे हाती घेण्यासाठी 'राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची' (NDRF) ची स्थापना करण्याची तरतूद कायद्यात आहे.

→ आपत्ती प्रतिसाद निधी व आपत्ती निवारण निधी : ह्या कलमांतर्गत आपत्ती व्यवस्थापनासाठी लागणाऱ्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. आपत्ती निवारण निधी हा आपत्ती टाळू नये किंवा आपत्तीची तीव्रता कमी व्हावी म्हणून करावयाच्या उपायांसाठी आहे, तर आपत्ती प्रतिसाद निधी हा आपत्तीचा सक्षमपणे सामना करावयाच्या कार्यासाठी उपलब्ध करण्यात आला आहे.

Excellent